नि.दि.दावा नं.४/२०१८
वसंत विरुध्द सतिश
CNR-MHSN14000019-2018

## नि.क्र.२३ वरील आदेश

प्रतिवादी नं.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज कैफियत नाही हा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं.१ व २ यांनी असे कथन केले आहे की, सदरील दाव्याचे कामकाज म्हणणे देण्यावर नेमण्यात आलेले होते. परंतू सदरील प्रतिवादी हे मुंबई याठिकाणी नोकरीस असल्याने तसेच महत्वाची कागदपत्रे मिळण्यासाठी महसूल खात्याकडून विलंब लागल्याने वेळेत म्हणणे व कैफियत देता आली नाही. परिणामी मे. कोर्टाने कैफियत नाही असा हुकूम पारीत केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींचा विचार होवून कैफियत नाही असा आदेश रद्द होवून मिळावा अशी विनंती केली आहे. वादीने सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथन खोटे व लबाडीचे आहे. कोणती कागदपत्रे मिळण्यास वेळ लागला व त्याचे कोणतेही कागद हजर केलेले नाहीत. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा. अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे या निर्णयाप्रत मे. कोर्ट आलेस वादी यांना प्रतिवादी कडून २०००/- कॉस्ट देणेचा हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर मी या मतास आलो आहे की, प्रतिवादी नं.१ व २ यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणांचा विचार करता, त्यांच्या विरुध्दचा विना कैफियत हा आदेश रद्द केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी नं.१ व २ यांची कैफियत रेकॉर्डवर आल्यास न्यायदानास मदत होईल. सत्य असत्य बाजू न्यायालयाच्या समोर येतील. म्हणून प्रतिवादी नं.१ व २ यांच्या विरुध्द कैफियत नाही असा झालेला आदेश वादीला खर्च म्हणून र.रु.२००/- देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Haridas Sandipan Satpute
Date: 2020.02.11 11:58:55 +0530

शिराळा

दिनांक १०/०२/२०२०        सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. K. Jadhav (Steno. Grade-3) |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/02/2020 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/02/2020 |
| Order uploaded on | : | 11/02/2020 |